# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २२३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०४/२०१८

## १) सोन्याचे दागीने व नगदी पैश्याची चोरी ;–

दिनांक २६/०४/२०१८ चे ११.०० वा. ते २९/०४/२०१८ चे १८.०० वाजता पुर्वी यातील फिर्यादी विश्वनाथ तुलाराम ठाकरे वय २७ वर्ष, रा. गोपेवाडा याची आई– वडील बाहेरगावी गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन घरात ठेवलेल्या गोदरेज आलमारीतील लॉकर मधुन १ सोन्याचे टॉप्स ५ ग्रॅम, १ सोन्याची अंगठी ५ ग्रॅम, व नगदी २५,००/–रु. असा एकुण ३२,५००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५७,४५४,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

## २) संगनमत करुन क्षुल्लक कारणावरुन लोंखडी बाल्टीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद ;–

दिनांक २९/०४/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सुलोचना भाऊदास चव्हाण वय ७० वर्ष, रा. टोली तुमसर ही त्याचे घराचे बाहेर नळाला पाणी आले किंवा नाही हे पहाण्यासाठी गेली असता यातील आरोपीतांनी फिर्यादीस तु आमच्या घराकडे का बघतोस! असे बोलुन नळाजवळ ठेवलेले लोंखडी बाल्टीने डोक्यावर मारुन जखमी करुन थापडबुक्यांनी मारहान केल्याने फिर्यादी यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राठोड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

## ३) शासकीय कामात अडथळा निर्माण करुन अश्लिल शिवीगाळ करुन पाहुन घेण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २९/०४/२०१८ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे आरोपीचे वडीलाचे नावाचे असलेले सुचनापत्र सार्वजनिक रोडवर तामील करित असतांनी यातील आरोपीने तेथे येवुन आपले वडीलास वॉरंट घेवु नकोस असे बोलुन शासकीय कामात अडथळा निर्माण करुन फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन पाहुन घेण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३५३,२९४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. सुनगार पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

## ४) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे दोन जखमी :–

दिनांक २८/०४/२०१८ चे २३.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी अनिल केवळराम पडोळे वय ४९ वर्ष, रा. लाखनी याचा काका मारोती सिदुजी पडोळे वय ६० वर्ष, रा. समर्थ कॉलेज जवळ मुरमाडी हा गावात रिसेप्शन कार्यक्रम आटोपुन घरी पायी येत असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे काकास मुरमाळी कुमार पेट्रोलपंप येथे धडक मारुन उजव्या हाताला गंभिर मार लागुन तसेच उजवा टोंगरा खालुन मोडल्याने तसेच मोटार सायकल चालक स्वत: जखमी होवुन अपघातास कारणीभुत झाल्याने फिर्यादी तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेंभुर्णे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

५) क्षुल्लक कारणावरुन बासाच्या काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक २९/०४/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सौ. मुजुशा ज्ञानेश्वर मलकाम वय ३२ वर्ष, रा. भुयार हा व आरोपी हे पती पत्नी असुन आरोपी पती हा दारु पिण्याचा सवईचा असुन आरोपी हा दारु पाणी पिऊन येवुन घरातील तांदुळ व काळया विकण्या करीता घेवुन जात असतांना यातील फिर्यादी पत्नीने हटकले असता आरोपी पतीने चिडुन जावुन तिला शिवीगाळ करुन बासाच्या काठीने मारुन जखमी केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेंभुर्णे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

६) क्षुल्लक कारणा वरून डोक्यावर विटाने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक २९/०४/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी [illegible] एकाच गावाचे राहणारे असुन त्याचे घर जवळ जवळ आहे व जुन्या भांडणामुळे बोलाचाली बंद आहे यातील फिर्यादीचे घरच्या कुत्रीने त्याच्या घरात जावुन भात खाल्याने फिर्यादीची पत्नी शिवीगाळ करीत होती त्यावरून आरोपीने मला शिवीगाळ का करते असे म्हणुन फिर्यादीचे पत्नीला विटाने मारपीट केली व फिर्यादी हा भांडण सोडवीण्यास आला असता, त्याचे डोक्यावर विटाने मारून जखमी केले व शिवीगाळ करून पुढे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी मोतीराम नारायण ठवकर वय ६० वर्ष रा. उसरागोंदी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

७) काळी पिवळी वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे वाहन पलटी होवुन वाहनातील पुरुष व महिला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक २९/०४/२०१८ चे १७.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन आपले व वाहना वरील नियत्रंण सुटल्याने वाहन रोडचे कडेला पलटी होवुन त्यात बसलेले प्रवासी पुरुष व महिला यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सुभायु निलकंठ भेंडारकर वय ३४ वर्ष, रा. मानेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

८) दारू पिवुन वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक २९/०४/२०१८ चे १६.३० वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही दारु पिवुन दारुच्या नशेत कलेक्टर चौक येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल अॅनालायझर मशिन व्दारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. घरडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

९) अचानक चालत्या ट्रक मध्ये आल्याने तरुणाचा मृत्यु :—

दिंनाक २९/०४/२०१८ चे १६.३० वाजता दरम्यान यातील मृतक गणेश शेखर मेनवाडे वय १८ वर्ष, रा. सिंधपुरी हा ट्रक क्र. एमएच ३६A५७६६ वर कन्डयाक्टरचे काम करीत असता यातील मृतक हा अचानक चालत्या ट्रक मध्ये झटका आल्याने तो बोलत नसल्याने चालक याने औषधोपचारा करीता ग्रा. रु. पवनी येथे भरती केले असता तेथील डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने फिर्यादी नरेश विठोबाजी बावणे वय ३७ वर्ष, रा. गोसेखुर्द यांचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत.

**१०) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :–**

दिंनाक २९/०४/२०१८ चे ०८.३० वाजता दरम्यान यातील मृतक रामकृष्ण आळकु माहुर्ले वय ६५ वर्ष, रा. लाखांदुर अती मद्य प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता ग्रामीण रुग्नालय लाखांदुर येथे भरती केले असता तेथील डॉ. नी पुढील उपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे रेफर केल्याने त्यास सामान्य रुग्नालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जा.फौ.चे कागदपत्र प्राप्त पोना. गोंधडे पो. स्टे. लाखांदुर चे हस्त पेश केल्याने सरतर्फे फिर्यादी मपोना. काळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भलावी पोलीस स्टेशन लाखांदुर करीत आहेत.

**११) जळाल्याने महिलेचा मृत्यु:–**

दिंनाक २५/०४/२०१८ चे ०९.०० ते २८/०४/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. सुषमा प्रेमदास वाघाडे वय २३ वर्ष रा. खंडाळा हि दि. २५/४/२०१८ ला ०९.०० वाजता दरम्यान आपले घरी चुलीवर स्वयंपाक करीत असता, चुलीमधील पेटती काळीने, मृतकचे साडीला आग लागल्याने पुर्ण साडी व कपडे १०० टक्के जळाल्याने, तिला औषधोपचारा करीता ग्रा. रू. साकोली सामान्य रूग्नायल भंडारा येथे वार्ड क्र. १९ मध्ये भरती केले असता उपचारादरम्यान दि. २८/४/२०१८ ला १९.०० वाजता मरण पावल्याने, डॉ. मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र.००/१८ कलम १७४ जा.फौ अन्वये दाखल करून मर्गचे कागदपत्र पो.स्टे. भंडारा जावक क्र. २३७८/१८ दि. २९/४/२०१८ नुसार कागदपत्र प्राप्त झाल्याने,सरतर्फे फिर्यादी पोहवा. लेंडे यांचे रिपोर्ट पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली करीत आहेत.

**१२) रेल्वे पटरीवर तरून व तरूणीचे प्रेत मिळुन आल्याने मर्ग नोंद :–**

दिंनाक २९/०४/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील दोन्ही मृतक १) विनोद देवदास कोवे वय २५ वर्ष रा. वांगी २) कु. ममता कोहळे वय २१ वर्ष रा. कोका ह.मु. वांगी हे रेल्वे पटरीवर मृताअवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी निलकंठ बळीरामजी कापगते वय ४९ वर्ष रा. बोदरे यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. निंबेकर पोलीस स्टेशन साकोली करीत आहेत.

**१३) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २९/०४/२०१८ चे १७.१५ ते १७.४० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भिलेवाडा/ करचखेडा फाटयाजवळ करखेडा कडे जाणारा डांबरी रोड येथे सार्वजनीक रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करुन मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. भुरले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भुरले पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.